Adda247

# Decoding

# MAHAPRISONS RECRUITMENT 2024

## डीकोडिंग महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024



**समाविष्ट**

- विहंगावलोकन
- महत्त्वाच्या तारखा
- अधिसुचना
- रिक्त पदे
- अर्ज लिंक
- शैक्षणिक पात्रता
- वयोमर्यादा
- परीक्षेचे स्वरूप
- अर्ज शुल्क
- मॉडेल प्रश्नपत्रिका (उत्तरासहित)

# Decoding Mahaprisons Recruitment 2024

## महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024: विहंगावलोकन

महाराष्ट्र कारागृह विभाग भरती **2024:** महाराष्ट्र शासन, कारागृह विभागाने दिनांक 01 जानेवारी 2024 रोजी विविध संवर्गातील एकूण 255 रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 जाहीर केली आहे. त्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवार दि. 01 जानेवारी 2024 ते 21 जानेवारी 2024 या कालावधीत ऑनलाईन पद्धतीने अर्ज करू शकतात. महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 चे विहंगावलोकन खालील तक्त्यात दिले आहे.

| महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024: विहंगावलोकन | |
|---|---|
| **श्रेणी** | **सरकारी नोकरी** |
| विभाग | महाराष्ट्रात शासन, कारागृह विभाग |
| भरतीचे नाव | महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 |
| पदांचे नाव | विविध संवर्गातील पदे |
| एकूण रिक्त पदे | 255 |
| अर्ज सुरूवात करण्याची तारीख | 01 जानेवारी 2024 |
| अर्ज करण्याची शेवठची तारीख | 21 जानेवारी 2024 |
| नोकरीचे ठिकाण | संपूर्ण महाराष्ट्र |
| अधिकृत संकेतस्थळ | www.mahaprisons.gov.in |

## महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 महत्वाच्या तारखा

महाराष्ट्र कारागृह विभाग 2024 संबंधी अर्ज प्रक्रिया आणि महाराष्ट्र कारागृह विभाग भरती संबंधित सर्व महत्वाच्या तारखा लवकरच जाहीर होतील.

| महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 महत्वाच्या तारखा | |
|---|---|
| **कार्यक्रम** | **तारीख** |
| महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 अधिसुचना | 01 जानेवारी 2024 |
| महाराष्ट्र कारगृह विभाग अर्ज सुरुवात करण्याची तारीख | 01 जानेवारी 2024 |
| महाराष्ट्र कारागृह विभाग अर्ज करण्याची शेवटची तारीख | 21 जानेवारी 2024 |

## महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 अधिसूचना

दिनांक 01 जानेवारी 2024 रोजी महाराष्ट्र शासन, कारागृह विभागाने विविध संवर्गातील एकूण 255 रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 जाहीर केली आहे. उमेदवार खाली दिलेल्या लिंकवर जाऊन महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 अधिसूचना डाउनलोड करू शकतात.

**महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 अधिसूचना**

## महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 रिक्त पदांची संख्या

महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 मध्ये एकूण 255 पदे भरली जाणार आहेत. रिक्त पदांचा तपशील खालील तकत्यात प्रदान करण्यात आला आहे.

| महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 रिक्त पदे | |
|---|---|
| **पदाचे नाव** | **पद संख्या** |
| लिपिक | 125 |
| वरिष्ठ लिपिक | 31 |

| | |
|---|---|
| लघुलेखक निम्न श्रेणी | 04 |
| मिश्रक | 27 |
| शिक्षक | 12 |
| शिवणकाम निदेशक | 10 |
| सुतारकाम निदेशक | 10 |
| प्रयोगशाळा तंत्रज्ञ | 08 |
| बेकरी निदेशक | 04 |
| ताणाकार | 06 |
| विणकाम निदेशक | 02 |
| चर्मकला निदेशक | 02 |
| यंत्र निदेशक | 02 |
| निटिंग अँड विव्हिंग निदेशक | 01 |
| करवत्या | 01 |
| लोहारकाम निदेशक | 01 |
| कातारी | 01 |
| गृह पर्यवेक्षक | 01 |
| पंजा व गालीचा निदेशक | 01 |
| ब्रेललिपी निदेशक | 01 |
| जोडारी | 01 |
| प्रिप्रेटरी | 01 |
| मिलिंग पर्यवेक्षक | 01 |
| शारीरिक कवायत निदेशक | 01 |
| शारीरिक शिक्षक निदेशक | 01 |
| एकूण | **255** |

## महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 अर्ज लिंक

उमेदवार खाली दिलेल्या लिंकवर जाऊन महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 साठी ऑनलाईन अर्ज करू शकतात.

**महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 अर्ज लिंक**

## महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 शैक्षणिक पात्रता

महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 साठी आवश्यक शैक्षणिक पात्रता वेगवेगळया पदानुसार वेगवेगळी असून खालील तक्त्यात दिलेली आहे.

| महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 शैक्षणिक पात्रता | |
|---|---|
| **पदाचे नाव** | **शैक्षणिक पात्रता** |
| लिपिक | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी परिक्षा उत्तीर्ण |
| वरिष्ठ लिपिक | मान्यताप्राप्त विद्यापीठाची कोणत्याही शाखेची पदवी परिक्षा उत्तीर्ण |
| लघुलेखक निम्न श्रेणी | स एस सी किंवा समतुल्य परिक्षा उत्तीर्ण तसेच शॉटहँड उत्तीर्ण स्पीड 100 प्रति शब्द मि. व टाईपरायटिंग उत्तीर्ण मराठी/इंग्रजी -40 प्रति शब्द मि. |
| मिश्रक | एसएससी/एचएससी किंवा तत्सम व औषध व्यवसायाची पदविका किंवा पदवी उत्तीर्ण तसेच पंजीकृत औषध व्यावसायीक म्हणून Bombay state Pharmacy council ला नांव नोंदणी आवश्यक, (अनुभव असल्यास प्राधान्य) |

| | |
|---|---|
| शिक्षक | एसएससी/एचएससी किंवा तत्सम, व शिक्षण पदविका उत्तीर्ण (प्रौढ शिक्षणवर्ग चालविण्याचा पुर्वानुभव असल्यास प्राधान्य) |
| शिवणकाम निदेशक | एसएससी/महाराष्ट्र तंत्र शिक्षण विभागाचे अथवा समतुल्य मास्टर टेलर प्रमाणपत्र तसेच टेलरिंग फर्ममध्ये दोन वर्षाचा प्रत्यक्ष कामाचा व व्यवहारीक अनुभव असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक. |
| सुतारकाम निदेशक | एसएससी/महाराष्ट्र तंत्र शिक्षण विभागाचे अथवा समतुल्य सुतारकाम प्रमाणपत्र तसेच सुतारकाम व्यवसायातील दोन वर्षाचा प्रत्यक्ष कामाचा व व्यवहारीक अनुभव असल्याचे प्रमाणपत्र आवश्यक. |
| प्रयोगशाळा तंत्रज्ञ | भौतीक व रसायन हे विषय घेऊन शास्त्र शाखेची इन्टरमिटीएट परीक्षा अथवा एचएससी उत्त्तीर्ण आणि शासनमान्य प्रयोगशाळा तंत्राचे 1 वर्षाचे प्रशिक्षण उतीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र |
| बेकरी निदेशक | एसएससी/महाराष्ट्र तंत्र शिक्षण विभागाचे अथवा समतुल्य बेकरीमध्ये आणि कन्फेक्शनरी मध्ये क्राप्ट मॅनशिप चे प्रमाणपत्र तसेच बेकरी उद्योगामध्ये लागणाऱ्या कच्या मालाचा हिशेब ठेवण्यासाठी सक्षम असैलेबाबत व प्रत्यक्ष कामाचा दोन वर्षाचा अनुभव आवश्यक |
| ताणाकार | एसएससी/एचएससी व महाराष्ट्र तंत्र शिक्षण विभागाचे अथवा समतुल्य ताणाकार प्रमाणपत्र तसेच विविध प्रकारच्या वार्पिंग मशीनवर, सुत किंवा रेशीम कारखान्यात प्रत्यक्ष काम केल्याचा दोन वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| विणकाम निदेशक | शासनमान्य संस्थेमधुन विणकाम टेक्नॉलॉजीचे प्रमाणपत्र तसेच दोन वर्षाचा प्रत्यक्ष कामाचा व व्यवहारिक अनुभव आवश्यक आहे. (प्रथम आणि व्दितीय श्रेणीतील प्रमाणपत्र व वस्त्रोद्योग क्षेत्रातील अनुभव असल्यास प्राधान्य ) |
| चर्मकला निदेशक | एसएससी/महाराष्ट्र तंत्र शिक्षण विभागाचे अथवा समतुल्य फुट वेअर निर्मितीचे प्रमाणपत्र चर्मकला उद्योगासाठी आवश्यक कच्च्या मालाचा हिशेब ठेवण्यास सक्षम असणे व प्रत्यक्ष कामाचा दोन वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| यंत्र निदेशक | एसएससी/महाराष्ट्र तंत्र शिक्षण विभागाचे यांत्रिक Machinist प्रमाणपत्र व प्रत्यक्ष कामाचा तीन वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| निटिंग अँड विव्हिंग निदेशक | एसएससी/एचएससी, महाराष्ट्र तंत्र शिक्षण विभागाचे अथवा समतुल्य विव्हिंग टेक्नॉलॉजी प्रमाणपत्र व कार्पेट उद्योगात प्रत्यक्ष काम केल्याचा दोन वर्षाचा अनुभव आवश्य |
| करवत्या | चौथी उत्त्तीर्ण व सॉ मिलमध्ये स्वॉयर कामाचा एक वर्षाचा प्रत्यक्ष अनुभव आवश्यक. |
| लोहारकाम निदेशक | एसएससी/एच एस सी, महाराष्ट्र तत्र शिक्षण विभागाचे अथवा समतुल्य लोहारकाम संबंधी शिट मेटल किंवा टिन स्मिथी वर्क किंवा मेटलचे प्रमाणपत्र तसेच धातु उद्योगातील प्रत्यक्ष कामाचा तीन वर्षाचा अनुभव आवश्यक असून धातु उद्योगासाठी आवश्यक कच्या मालाचा हिशेब ठेवण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. |
| कातारी | एसएससी/महाराष्ट्र तत्र शिक्षण विभागाचे अथवा समतुल्य कातारी (टर्नर) प्रमाणपत्र व कारखान्यात प्रत्यक्ष कामाचा तीन वर्षाचा अनुभव आवश्यक असून टर्नरसाठी आवश्यक कच्या मालाचा हिशेब ठेवण्यास सक्षम असणे आवश्यक आहे. |
| गृह पर्यवेक्षक | एसएससी इंग्रजी विषयासह उत्त्तीर्ण / कनिष्ठ प्राथमिक शिक्षण प्रमाणपत्र अथवा पदविका शिक्षण प्रमाणपत्र. (प्रौढ शिक्षण वर्ग आयोजित करण्याचा किंवा शिक्षक म्हणून अनुभव असल्यास प्राधान्य. |
| पंजा व गालीचा निदेशक | एसएससी/महाराष्ट्र तत्र शिक्षण विभागाचे अथवा समतुल्य विणकाम प्रमाणपत्र तसेच पंजा आणि गालीचा निर्मिती बाबत प्रत्यक्ष कामाचा दोन वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| ब्रेललिपी निदेशक | एसएससी/ शासन मान्य अंध शिक्षण प्रमाणपत्र तसेच शासनमान्य किंवा अनुदानित अंध शाळेत शिक्षक म्हणून काम केल्याचा एक वर्षाचा अनुभव आवश्यक |
| जोडारी | एसएससी/महाराष्ट्र तत्र शिक्षण विभागाचे अथवा समतुल्य फिटर प्रमाणपत्र तसेच प्रत्यक्ष कामाचा दोन वर्षाचा अनुभव आणि फिटर कामासाठी लागणाऱ्या कच्या मालाचा हिशेब ठेवण्यास सक्षम असणे आवश्यक. |
| प्रिप्रेटरी | एसएससी/महाराष्ट्र तत्र शिक्षण विभागाचे अथवा समतुल्य वार्पिंग/सायजिंग/वायडिंग प्रमाणपत्र व प्रत्यक्ष कामाचा दोन वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| मिलिंग पर्यवेक्षक | एसएससी/महाराष्ट्र तत्र शिक्षण विभागाचे अथवा समतुल्य वुलन टेक्निशियन प्रमाणपत्र तसेच वुलन मिलमधील मिलींग व वूलन रेझिनचा प्रत्यक्ष कामाचा दोन वर्षाचा अनुभव आवश्यक. |
| शारीरिक कवायत निदेशक | एसएससी / शारिरीक कवायत पदविका उत्तीर्ण किंवा समकक्ष टी डी पी ई कांदीवली, अथ्वा तत्सम महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त पदवी प्रमाणपत्र. |
| शारीरिक शिक्षक निदेशक | एसएससी/ शारिरीक शिक्षण उत्तीर्ण प्रमाणपत्र अथवा बी टी पदवी उत्तीर्ण अथवा तत्सम महाराष्ट्र शासन मान्यताप्राप्त प्रमाणपत्र असल्यास प्राधान्य. |

## महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 आवश्यक वयोमर्यादा

महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 साठी आवश्यक वयोमर्यादा खाली दिलेली आहे.

- वयोमर्यादा गणण्याचा दिनांक 01/01/2024 राहील.
- खुल्या प्रवर्गासाठी - 18 ते 38 वर्ष
- मागर्वर्गीय प्रवर्गासाठी - 18 ते 43 वर्ष
- पदवीधर अंशकालीन प्रवर्गासाठी - 18 ते 55 वर्ष
- खेळाडू प्रवर्गासाठी - 18 ते 43 वर्ष
- दिव्यांग प्रवर्गासाठी - 18 ते 45 वर्ष
- प्रकल्पग्रस्त/ भूकंपग्रस्त प्रवर्गासाठी- 18 ते 45 वर्ष

## महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 परीक्षेचे स्वरूप

महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 परीक्षेचे स्वरूप खाली सविस्तरपणे दिले आहे.

**महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 परीक्षेचे स्वरूप**

| पदाचे नाव | मराठी | | इंग्रजी | | सामान्य ज्ञान | | बौद्धिक चाचणी / अंकगणित | | एकूण | | वेळ |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | प्रश्न | गुण | |
| लिपिक | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 100 | 200 | 120 मिनिट |
| वरिष्ठ लिपिक | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 25 | 50 | 100 | 200 | 120 मिनिट |
| लघुलेखक निम्न श्रेणी | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 60 | 120 | 80 मिनिट |
| बाकी सर्व पदे | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 15 | 30 | 60 | 120 | 80 मिनिट |

- लघुलेखक निम्न श्रेणी व तांत्रिक संवर्गातील उक्त नमुद क्र 4 ते 25 मधील सर्व पदांकरिता 80 गुणांची व्यवसायिक चाचणी घेण्यात येईल. तथापि जे उमेदवार प्रथम परिक्षेत ४५% गुण प्राप्त करतील अशा उमेदवारांना व्यवसायिक चाचणी देता येईल.
- परिक्षा कालावधी :-
  - ऑनलाईन परिक्षा :- 1 तास 20 मिनिटे (80 मिनिटे)
  - व्यवसायिक चाचणी :- 40 मिनिटे
- परीक्षा ही ऑनलाईन (Computer Based Test) पद्धतीने घेण्यात येईल. परीक्षेच्या प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपात असतील. प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक प्रश्नास अधिकाधिक 02 गुण ठेवण्यात येतील.
- महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभागाकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं 1222/प्र.क्र.54/का.13- अ दि. 4 मे 2022 मधील तरतुदीनुसार लिपिक व वरिष्ठ लिपिक पदासाठी पदवी हि कमीत कमी शैक्षणिक अर्हता असल्याने सदर पदासाठी परीक्षेचा दर्जा भारतातील मान्यताप्राप्त विद्यापीठाच्या पदवी परीक्षेच्या समान राहील. परंतु मराठी व इंग्रजी या विषयाच्या प्रश्नपत्रिकेचा दर्जा उच्च माध्यमिक शालांत परीक्षेच्या (इयत्ता 12 वी) च्या दर्जाच्या समान राहील व परीक्षेला मराठी, इंग्रजी, सामान्य ज्ञान व बौद्धिक चाचणी या विषयावर प्रश्नाकरिता प्रत्येकी 50 गुण ठेवून एकुण 200 गुणांची ऑनलाईन पध्दतीने परीक्षा घेण्यात येईल.
- परीक्षा ही Computer Based Test पद्धतीने घेण्यात येणार असून प्रत्येक सत्राच्या प्रश्नपत्रिका स्वतंत्रपणे उपलब्ध केल्या जाणार असून एकापेक्षा जास्त सत्रात परीक्षा आयोजित करण्यात आल्या तर सत्र 1 ते अंतिम सत्र यामधील प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व त्याची कठिण्याता तपसाण्यात येऊन त्योच समानीकरण करण्याचे (Normalization) पद्धतीने गुणांक निश्चित करुन निकाल जाहीर करण्यात येईल. (Normalization) बाबत TCS कंपनीकडून देण्यात आलेले सुत्र वेबसाईटवर माहितीसाठी प्रकाशित केलेला आहे. सदर (Normalization) सर्व परीक्षार्थी यांना बंधनकारक राहील. याची सर्व परीक्षार्थी यांनी नोंद घ्यावी.

## महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 अर्ज शुल्क

महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 साठी अर्ज शुल्क खाली देण्यात आला आहे.

| महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024: अर्ज शुल्क | |
|---|---|
| प्रवर्ग | अर्ज शुल्क |
| खुला प्रवर्ग | रु. 1000 |
| इतर सर्व प्रवर्ग | रु. 900 |

## महाराष्ट्र कारागृह विभाग भरती 2024 मॉडेल प्रश्नपत्रिका (उत्तरासहित)

लिपिक व वरिष्ठ लिपिक पदांसाठी मॉडेल प्रश्नपत्रिका (उत्तरासहित) खाली देण्यात आला आहे.

## प्रश्नपत्रिका

**Q1** किंकर या शब्दाला समानार्थी शब्द ओळखा
(a) सेवक
(b) कंजूष
(c) राजीव
(d) सुधाकर

**Q2.** चपला या शब्दाला समानार्थी शब्द ओळखा
(a) विदयुत
(b) रमा
(c) लता
(d) कमला

**Q3.** अजस्त्र या शब्दाला विरुद्धार्थी शब्द ओळखा.
(a) वर्णनीय
(b) बलाढ्य
(c) चिमुकले
(d) अजय

**Q4.** मलूल या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द ओळखा.
(a) कंटाळवाणे
(b) टवटवीत
(c) नाजूक
(d) कठीण

**Q5.** खालील अलंकारिक शब्दासाठी दिलेल्या पर्यायातून योग्य शब्द निवडा
पांढरा कावळा
(a) निसर्गात नसलेली वस्तू
(b) रंग
(c) कावळा
(d) भाकड कथा

**Q6.** कधीही न दिसणारी कुसुम, दुर्मिळ वस्तूप्रमाणे वारंवार दृष्टीस पडत नाही. या स्पष्टीकरणासाठी योग्य वाक्प्रचार निवडा.
(a) उंबराचे फूल
(b) गुलाबाचे फुल
(c) कपिला षष्ठीचा योग
(d) गट्टी फू करणे

**Q7.** 'गुप्त गोष्ट तिसऱ्यास सांगणे' या अर्थाचा वाक्प्रचार ओळखा.
(a) दृढ मैत्री होणे
(b) ढवळाढवळ करणे
(c) षट्कर्णी होणे
(d) शहानिशा करणे

**Q8.** चंदन करणे या वाक्प्रचाराचा अर्थ सांगा.
(a) नाश करणे
(b) सत्कर्म करणे
(c) आनंद फुलवणे
(d) सेवा करणे

**Q9.** 'काडी चोर तो माडी चोर' या म्हणीचा अर्थ ओळखा.
(a) क्षुल्लक अपराधाचा मोठा अपराधाशी संबंध जोडणे
(b) वाईट कृत्य करणाऱ्याच्या मनात डाचत असते
(c) नको तिथे नको ती गोष्ट करणे
(d) आणखी वाईट होणे

**Q10.** अनेक गोष्टीत एकाच वेळी लक्ष देणारा या शब्दसमूहासाठी योग्य शब्द कोणता ते सांगा
(a) एकचित
(b) एकाग्र
(c) कुशाग्र
(d) अष्टावधानी



**Q11.** वाक्याच्या शेवटी तपशील द्याव्यास असल्यास कोणते विरामचिन्ह वापरतात?
(a) पूर्णविराम
(b) स्वल्पविराम
(c) अपूर्ण विराम
(d) अर्धविराम

**Q12.** खालील साधित शब्दाचा प्रकार ओळखा : 'प्रतिक्रिया'
(a) प्रत्यघटित शब्द
(b) उपसर्गघटित शब्द
(c) सामासिक शब्द
(d) अभ्यस्त शब्द

**Q13.** पुढीलपैकी तेलगू शब्दांचा गट ओळखा.
(a) अनारसा, शिकेकाई
(b) गुंडी, चप्पल
(c) थाली, दादर
(d) गुडघा, हाड

**Q14.** येथे समस्त बहिरे बसतात लोक
का भाषणे मधुर तू करिशी अनेक
हे मूर्ख यासि किमपीहि नसे विवेक
रंगावरून तुजला म्हणतील काक
वरील पंक्तीचा अलंकार ओळखा
(a) स्वभावोक्ती अलंकार
(b) व्याजस्तुती अलंकार
(c) अन्योक्ती अलंकार
(d) दृष्टांत अलंकार

**Q15.** पुढील सामासिक शब्दाचा समास ओळखा
सेवानिवृत्त
(a) तत्पुरुष समास
(b) अव्ययीभाव समास
(c) द्वंद्व समास
(d) बहुव्रीही समास

**Q16.** 'अव्ययसाधित विशेषण' असलेले विधान पर्यायी उत्तरात कोणते आहे ?
(a) बोलक्या बाहुल्यांचा खेळ सर्वांनाच आवडतो.
(b) आज तुम्ही कोणत्या गावाला जाणार?
(c) बनारसी बोरे रसाळ असतात.
(d) ते गव्हाचे पोते पुढच्या माळीत ठेव.

**Q17.** स्वार्थ, अज्ञार्थ, विद्यार्थ आणि संकेतार्थ हे चार प्रकार कोणत्या शब्द जातीचे आहेत?
(a) नाम
(b) विशेषण
(c) सर्वनाम
(d) क्रियापद

**Q18.** 'मी गाणे गात असे' या वाक्यातील काळ ओळखा.
(a) अपूर्ण भूतकाळ
(b) रीती भूतकाळ
(c) रीती वर्तमानकाळ
(d) रीती भविष्यकाळ

**Q19.** यथास्थित, वाजवी व पूर्णपणे या क्रियाविशेषण अव्ययांचा प्रकार कोणता ?
(a) रीतिवाचक क्रियाविशेषण अव्यय
(b) कालवाचक क्रियाविशेषण अव्यय
(c) परिमाण दर्शक क्रियाविशेषण अव्यय
(d) स्थलवाचक क्रियाविशेषण अव्यय

**Q20.** 'दशभुजा' हा कोणत्या प्रकारचा समास आहे ?
(a) द्वंद्व समास
(b) कर्मधारय समास
(c) तत्पुरूष समास
(d) बहुव्रीही समास

**Directions (21-25): खालील उतारा वाचून त्यावरील प्रश्नांची उत्तरे द्या.**

भारत हा जगातील सर्वात मोठा बिगरबासमती तांदळाचा पुरवठादार. जागतिक बाजारात अशा प्रकारच्या तांदळाच्या बाजारपेठेतील 40 टक्के तांदूळ फक्त आपण एकटे पुरवतो. गतसाली जगभरातील बाजारपेठेत साडेपाच कोटी टन तांदळाचा व्यवहार झाला. त्यापैकी 40 टक्के तांदूळ हा भारतात पिकलेला होता. आपण जागतिक बाजारात ओतलेला 2.22 कोटी टन हा तांदूळ साठा थायलंड, व्हिएतनाम, पाकिस्तान आणि अमेरिका या चार देशांनी एकत्रितपणे केलेल्या निर्यातीपेक्षाही अधिक आहे. यावरून जागतिक तांदूळ बाजारातील आपल्या स्थानाचा आणि आकाराचा अंदाज यावा. जगास पुरवठा केल्यानंतरही भारताच्या अन्न महामंडळाच्या गुदामात कायम किमान 1.35 कोटी टन इतका तांदळाचा साठा कायम असायला हवा. तो तूर्तास चार कोटी टनांहून अधिक आहे. याचा अर्थ जगास पुरवठा केल्यानंतर आपण तांदळाची पुरेशी बेगमी करून ठेवलेली आहे. यात यंदा पिकल्या जाणाऱ्या तांदळाची अर्थातच भर पडेल. यंदा आपल्याकडे तांदळाचा पेरा गतसालापेक्षा अधिक आहे. उशिराने आलेल्या पावसामुळे काही प्रमाणात नुकसान होईल हे गृहीत धरले तरी तांदळाचा साठा आपल्याकडे निश्चितच सर्वांस पुरून उरेल इतका आहे. तेव्हा आपल्या तांदूळ निर्यातबंदीच्या निर्णयाचे समर्थन तांदूळ उपलब्धतेच्या आकडेवारीवरून तरी करता येणार नाही. तसेच या वर्षी गतसालाच्या तुलनेत तांदळाच्या दरांत सरासरी दहा टक्क्यांची वाढ झालेली आहे. याचा दुसरा अर्थ असा की जागतिक पातळीवर तांदूळ विकून भारतीय शेतकऱ्यांसाठी अतिरिक्त उत्पन्न मिळवणे शक्य आहे. ते तसे मिळाले तर आपल्या शेतकऱ्यांस त्याचा फायदाच होईल. परंतु अशी फायदा मिळविण्याची शक्यता असतानाच आपण नेमकी निर्यातबंदी केली. गव्हाबाबतही हेच झाले. भारतात पुरेसा गहू असताना आणि जागतिक पातळीवर त्यास मागणी असताना आपण गतसाली गहू निर्यातबंदी केली. आपला तांदूळ निर्यातबंदीचा निर्णय जाहीर झाल्या झाल्या लगेच दुसऱ्या दिवशी अन्य देशांकडून जागतिक बाजारात येणाऱ्या तांदळाचे दर वाढले. व्हिएतनाम आणि थायलंड हे अन्य दोन बिगरबासमती तांदळाचे पुरवठादार.

आपल्या तांदूळ निर्यातबंदी निर्णयाचा मोठा फायदा या दोन देशांतील शेतकऱ्यांस होणार हे उघड आहे. म्हणजे एका बाजूने आपल्या निर्णयाने या देशांतील शेतकऱ्यांचे उखळ पांढरे होईल आणि दुसरीकडे गरीब अफ्रिकी देशांतील अन्नवंचितांचे जगणे अधिक महाग होईल. तेव्हा या निर्यातबंदीने नक्की काय साध्य होणार, हा आपल्यासाठी कळीचा प्रश्न. शिवाय या फायद्या-तोटय़ाच्या गणितापलीकडेही एक मुद्दा महत्त्वाचा ठरतो. तो आपल्या विश्वसनीयतेबाबत. आंतरराष्ट्रीय मंचावर आपण गहू पुरवठय़ाच्या वल्गना करतो आणि गहू पुरवठा थांबवतो. तांदळाबाबत तशी काही घोषणा आपण केलेली नव्हती हे मान्य. पण तांदळाचे सर्वात मोठे निर्यातदार म्हणून आपण श्रेय घेतो. तरीही त्याच वेळी निर्यातीस बंदी करतो. हा विरोधाभास भारताविषयी खचितच विश्वास निर्माण करणारा नाही. जगातील पहिल्या तीन अर्थव्यवस्थांत स्थान मिळवू पाहणाऱ्या देशाने एवढय़ा-तेवढय़ा कारणांवरून आपली जागतिक बांधिलकी अशी वाऱ्यावर सोडू नये. देशांतील नागरिकांच्या गरजांस प्राधान्य वगैरे सर्व ठीक. पण महासत्तापदाचे मोठेपण केवळ तांदूळ निवडता निवडता मिळणारे नाही.

**Q21.** उताऱ्यावरून भारताने केलेल्या तांदूळ निर्यातबंदी निर्णयाचा मोठा फायदा कोणत्या देशांना होणार आहे ?
(a) व्हिएतनाम आणि थायलंड
(b) पाकिस्तान आणि व्हिएतनाम
(c) थायलंड आणि पाकिस्तान
(d) व्हिएतनाम आणि अमेरिका

**Q22.** प्रस्तूत उताऱ्यावरून यावर्षी गेल्या वर्षीच्या तुलनेत तांदळाच्या दरांत सरासरी किती टक्क्यांची वाढ झालेली आहे ?
(a) 10
(b) 13
(c) 12
(d) 15

**Q23.** प्रस्तूत उताऱ्यावरून गेल्या वर्षी जगभरातील बाजारपेठेत किती कोटी टन तांदळाचा व्यवहार झाला ?
(a) 5.5
(b) 4.5
(c) 40
(d) 2.22

**Q24.** भारतसोडून इतर कोणते दोन देश बिगरबासमती तांदळाचे पुरवठादार आहेत ?
(a) व्हिएतनाम आणि पाकिस्तान
(b) अमेरिका आणि थायलंड
(c) अमेरिका आणि व्हिएतनाम
(d) व्हिएतनाम आणि थायलंड

**Q25.** जागतिक बाजारात बिगरबासमती तांदळाच्या बाजारपेठेतील किती टक्के तांदूळ भारताकडून पूरविला जातो?
(a) 44 टक्के
(b) 30 टक्के
(c) 40 टक्के
(d) 60 टक्के

**Q26.** In the following question, out of the given four alternatives, select the one which best expresses the meaning of the given word.
**Temerity**
(a) Boldness
(b) Cowardice
(c) Distrust
(d) Uncertainty

**Q27.** In the following question, out of the given four alternatives, select the one which is opposite in meaning of the given word.
**Overweening**
(a) Arrogant
(b) Haughty
(c) Brash
(d) Modest

**Directions (28-29): In the following question, out of the given four alternatives, select the alternative which best expresses the meaning of the Idiom/Phrase.**

**Q28. All over hell's half acre**
(a) Degra ding oneself
(b) Everywhere
(c) To own a large piece of land
(d) To be sinful

**Q29. An arrow in the quiver**
(a) Strategies that can be followed
(b) Being vengeful
(c) Extremely old fashioned
(d) Types of weapons in one 's possession

**Directions (30-31): In the following question, out of the four alternatives, select the alternative which is the best substitute of the phrase.**

**Q30. Place where cows are sheltered**
(a) Pyre
(b) Dyke
(c) Byre
(d) Convey

**Q31. Palm reading**
(a) Bibliomancy
(b) Logomancy
(c) Chiromancy
(d) Amniomancy

**Q32.** In the following question, four words have been given out of which one word is incorrectly spelt. Select the incorrectly spelt word.
(a) Exasperated
(b) Excruchisating
(c) Exaggeration
(d) Exultation

**Directions (33-34): In the following question, the sentence given with blank to be filled in with an appropriate word. Select the correct alternative out of the four and indicate it by selecting the appropriate option.**

**Q33.** India is rushing headlong towards economic success and modernisation, counting on high-tech industries such as information technology and biotechnology to ______ the nation to prosperity.
(a) protect
(b) protract
(c) propel
(d) probe

**Q34.** It is true that transgenic plants can offer a range of benefits which are above and beyond those who ______ from more traditional innovations in cultivation.
(a) enacted
(b) entwined
(c) elected
(d) emerged

**Directions (35-37): In the following question, some part of the sentence may have errors. Find out which part of the sentence has an error and select the appropriate option. If a sentence is free from error, select 'No Error'.**

**Q35.** In Spiritualism, it is a part of services (1)/ to communicate with life (2)/ personalities in the spirit world. (3)/ No Error (4)
(a) 1
(b) 2
(c) 3
(d) 4

**Q36.** In Marxist philosophy, the bourgeoisie (1)/ are the social class that came to own (2)/ the means of production during industrialization. (3)/ No Error (4)
(a) 1
(b) 2
(c) 3
(d) 4

**Q37.** An atom is a smallest constituent unit (1)/ of ordinary matter that has the (2)/ properties of a chemical element. (3)/ No Error (4)
(a) 1
(b) 2
(c) 3
(d) 4

**Q38. The question below consists of a set of labelled sentences. These sentences, when properly sequenced form a coherent paragraph. Select the most logical order of sentences from among the options.**

P: Chennai and its sprawl extending to two neighbouring districts should return to the traditional wisdom of creating tanks and lakes for water storage, and rejuvenating old silted ones, in order to harvest the floods and replenish depleted groundwater.
Q: The finding from one study in 2013 shows that 27 tanks have totally disappeared and another
R: This underscores the need to revive such natural sponges.
S: Inviting the community to monitor the health of the tanks and lakes can keep out encroachers, who are often protected by patron-politicians.
(a) SQRP
(b) PQRS
(c) RPQS
(d) RPSQ

**Directions (39-40): Improve the bracketed part of the sentence.**

**Q39.** Amylase is present in the saliva of humans and some mammals, where (it began) the chemical process of digestion.
(a) it begins
(b) it begininning
(c) it begin
(d) No improvement

**Q40.** The phobia typically results in a rapid onset of fear and is present (for much than) six months.
(a) for much then
(b) from more than
(c) for more than
(d) No improvement

**Directions (41-45): In the following questions, sentences are given with blanks to be filled in with an appropriate word(s). Four alternatives are suggested for each question. Choose the correct alternative out of the four.**

**Q41.** My windows look _____ the garden.
(a) up on
(b) out on
(c) in
(d) at

**Q42.** I have made a rough ____ of the report.
(a) graph
(b) draught
(c) drought
(d) draft

**Q43.** The reward was not commensurate _______ the work done by us.
(a) for
(b) on
(c) with
(d) upon

**Q44.** I didn't care ____ the expense; I want the party to be a real success.
(a) of
(b) with
(c) about
(d) at

**Q45.** Vinay does not play cricket, and _____ does Yeshwant.
(a) so
(b) also
(c) either
(d) neither

**Directions (46-50): in the following questions, you have eight brief passage with 5 questions .**
following each passage. Read the passages carefully and choose the best answer to each question out of the four alternatives.

An old shepherd was playing on a flute on the marshlands outside Rome. He played so sweetly that a lovely fairy came and listened to him.
"Will you marry me, and play to me in my castle?" she said.
"Yes, yes, lovely lady!" said the shepherd.
The fairy put a ring on his finger. At once he became a handsome young man dressed in princely robes. "But I must first go to Rome and bid farewell to my friends", he said.
The fairy gave him a golden coach with twelve white horses. As he rode in State to Rome, he met the young Queen of Italy, who invited him to her place.
The shepherd saw that he had won the Queen's heart. He resolved to marry her and become the Kind of Italy and let the fairy go. So when he had an the Queen were alone together he knelt down and took her land, saying:
"Marry me, dearest and I will help you to govern Italy."
But at soon as he spoke he turned into an old and rugged shepherd.
"What is this horrible beggar doing here?" cried the Queen. "Whip him out of the palace."

**Q46.** The fairy wanted to marry the shepherd because
(a) he was very handsome.
(b) he had saved her life.
(c) he could play sweetly loved her.
(d) the shepherd loved her.

**Q47.** When the fairy put a ring on his finger, the shepherd
(a) disappeared
(b) changed into a handsome youth
(c) married her
(d) turned into a statue

**Q48.** The shepherd went to Rome in a
(a) palanquin
(b) boat
(c) cart
(d) coach

**Q49.** When the shepherd reached Rome, he
(a) planned to marry to the Queen of
(b) met his friends there.
(c) sought his parents' permission to marry the fairy.
(d) met the King of Italy.

**Q50.** The Queen ordered the shepherd to be whipped out of the palace because he
(a) refused to marry her
(b) turned old and ugly
(c) tried to steal her jewels
(d) revealed his plan to marry the fairy

**Q51.**गांधींना "महात्मा" ही पदवी कोणी दिली?
(a) रवींद्रनाथ टागोर
(b) बाळ गंगाधर टिळक
(c) पंडित जवाहरलाल नेहरू
(d) सरदार वल्लभभाई पटेल

**Q52.**सायमन कमिशनने भारताला भेट दिली तेव्हा व्हाईसरॉय कोण होते?
(a) लॉयड जॉर्ज
(b) लॉर्ड आयर्विन
(c) लॉर्ड वाचन
(d) लॉर्ड रिपन

**Q53.** काँग्रेस पक्षाच्या कट्टरपंथी शाखेने खालीलपैकी कोणाच्या विरोधात 'इंडिपेंडन्स फॉर इंडिया लीग' स्थापन केली होती?
(a) गांधी-आयर्विन करार
(b) होम-रूल चळवळ
(c) नेहरू अहवाल
(d) मॉन्टफोर्ड सुधारणा

**Q54.**पूर्ण स्वराज (संपूर्ण स्वातंत्र्य) हे भारतीयांचे राजकीय ध्येय म्हणून घोषित करणारा ठराव इ. स. 1929 मध्ये ____ यथील काँग्रेसच्या सभेत मंजूर करण्यात आला.
(a) शिमला
(b) लाहोर
(c) मद्रास
(d) कलकत्ता

**Q55.** भारतात एकूण क्षेत्रफळाच्या बाबतीत कोणते राज्य सर्वात मोठे आहे?
(a) महाराष्ट्र
(b) मध्य प्रदेश
(c) राजस्थान
(d) तामिळनाडू

**Q56.**भारताच्या खालील शेजारी देशांपैकी कोणता देश जगात सर्वात जास्त अफूचे उत्पादन करतो?
(a) पाकिस्तान
(b) अफगाणिस्तान
(c) श्रीलंका
(d) मालदीव

**Q57.** तालुका स्थरावर काम करणारी पंचायत राज मधील महत्वाची संस्था कोणती आहे?
(a) पंचायत समिती
(b) ग्रामसभा
(c) जिल्हा परिषद
(d) नगरपंचायत

**Q58.** विजेचे सर्वोत्तम वाहक कोणते घटक आहेत?
(a) चांदी
(b) तांबे
(c) ॲल्युमिनियम
(d) लोह

**Q59.** ध्वनीचा वेग ___ या माध्यमात जास्त असतो.
(a) हवा
(b) द्रव
(c) धातू
(d) व्हॅक्यूम

**Q60.** भारतात विकसित झालेला पहिला सुपर कॉम्प्युटर ___ हा आहे.
(a) परम
(b) आर्यभट्ट
(c) बुद्ध
(d) राम

**Q61.** उज्जैन हे भारताच्या मध्य प्रदेश राज्यातील उज्जैन जिल्ह्यातील सर्वात मोठे शहर आहे. हे खालीलपैकी कोणत्या नदीवर आहे?
(a) चंबळ
(b) नर्मदा
(c) सोन
(d) क्षिप्रा

**Q62.** बुट्टाबोमालू हा कोणत्या राज्यातील सर्वात प्रसिद्ध आणि लोकप्रिय नृत्य प्रकारांपैकी एक आहे?
(a) तामिळनाडू
(b) आंध्र प्रदेश
(c) मध्य प्रदेश
(d) त्रिपुरा

**Q63.** जलशक्ती मंत्रालय महात्मा गांधी यांची जयंती _____ म्हणून साजरी करणार आहे.
(a) स्वच्छ भारत दिवस
(b) जल शक्ती दिवस
(c) जलसंधारण दिवस
(d) पराक्रम दिवस

**Q64.** इंटरनॅशनल एस्ट्रोनॉटिकल फेडरेशन (IAF) चे उपाध्यक्ष म्हणून कोणाची निवड झाली आहे?
(a) जीएस मीना
(b) कापा कोली
(c) ए के अनिल कुमार
(d) गोविंद जैस्वाल

**Q65.** उल्कापाता पासून तयार झालेले महाराष्ट्रातील सरोवर कोणते?
(a) वुलर
(b) सांबर
(c) लोणार
(d) चिल्का

**Q66.** एव्हरेस्टवर दोनदा चढाई करणारी जगातील पहिली महिला असलेल्या भारतीय गिर्यारोहकाचे नाव काय आहे?
(a) बचेंद्री पाल
(b) अरुणिमा साहा
(c) संतोष यादव
(d) अंशू जमसेनपा

**Q67.** सुशासन दिन _____ रोजी साजरा केला जातो.
(a) 10 ऑक्टोबर
(b) 15 नोव्हेंबर
(c) 26 नोव्हेंबर
(d) 25 डिसेंबर

**Q68.** अग्नी वॉरियर व्यायामाची 12 वी आवृत्ती, _____ आणि भारतीय लष्कर यांच्यातील द्विपक्षीय सराव आहे.
(a) सिंगापूर
(b) जपान
(c) फ्रान्स
(d) यूएसए

**Q69.** नाईट फ्रँकच्या मते, प्रीमियम निवासी मालमत्तेची वार्षिक किंमत मोजणाऱ्या जागतिक निर्देशांकात कोणते भारतीय शहर 22 व्या क्रमांकावर आहे?
(a) मुंबई
(b) दिल्ली
(c) बेंगळुरू
(d) चेन्नई

**Q70.** उत्तराखंड सरकारने राज्याचा ब्रँड अँम्बेसेडर म्हणून डिसेंबर मध्ये कोणाची नियुक्ती केली आहे?
(a) ऋषभ पंत
(b) प्रसून जोशी
(c) एमएस धोनी
(d) अनुज रावत

**Q71.** कोणत्या डोंगररांगामुळे भीमा व कृष्णा नद्यांची खोरी वेगळी झाली आहेत?
(a) शंभू महादेव
(b) संह्याद्री
(c) गाविलगड
(d) यापैकी नाही

**Q72.** महाराष्ट्रात मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र कोणत्या जिल्हात आहे?
(a) सांगली
(b) पुणे
(c) कोल्हापूर
(d) सातारा

**Q73.** आगरकरांनी 15 ऑक्टोबर 1988 रोजी सुरु केलेल्या सुधारक या साप्ताहिकाच्या इंग्रजी आवृत्तीचे पहिले संपादक कोण होते?
(a) महात्मा फुले
(b) महात्मा गांधी
(c) गो. कृ. गोखले
(d) लोकमान्य टिळक

**Q74.** महाराष्ट्रातील महिला विकासासाठी काम करणारे कार्यकर्ते आणि संस्थांना कोणता पुरस्कार देण्यात येतो?
(a) अहिल्याबाई होळकर पुरस्कार
(b) सावित्रीबाई फुले पुरस्कार
(c) महिला सन्मान पुरस्कार
(d) यापैकी नाही


**Q75.** जायकवाडी प्रकल्पामुळे तयार झालेला जलाशय कोणत्या नावाने ओळखला जातो?
(a) तानाजीसागर
(b) नाथसागर
(c) शिवाजीसागर
(d) मेघदूत जलाशय

**Q76.** खालील चार शब्दांपैकी तीन शब्द एका विशिष्ट प्रकारे एकसारखे आहेत आणि एक वेगळा आहे. विषम शब्द निवडा.
(a) जर्मनी
(b) सिंगापूर
(c) ऑस्ट्रिया
(d) इटली







**Q77.** खाली दाखवल्याप्रमाणे कागद दुमडलेला आणि कापला आहे. उलगडल्यावर ते कसे दिसेल?



(a) 

(b) 

(c) 


(d) 


**Q78.** तीन विधाने दिली आहेत, त्यानंतर I, II आणि III क्रमांकाचे तीन निष्कर्ष आहेत. विधाने सत्य आहेत असे गृहीत धरून, जरी ते सामान्यतः ज्ञात तथ्यांशी भिन्न दिसत असले तरीही, विधानांमधून कोणते निष्कर्ष तार्किकपणे पाळले जातात ते ठरवा.
**विधाने**: काही निबंध म्हणजे कविता. काही कविता दिग्दर्शक आहेत. सर्व दिग्दर्शक गायक आहेत.
**निष्कर्ष**: I. काही दिग्दर्शक कविता आहेत.
II. काही गायक निबंध आहेत.
III. काही गायक कविता असतात.
(a) फक्त I आणि III निष्कर्ष अनुसरण करतात.
(b) फक्त निष्कर्ष II आणि III अनुसरण करतात.
(c) फक्त I आणि II निष्कर्षांचे अनुसरण करतात.
(d) फक्त I अनुसरण करतो.

**Q79.** खालील वर्गांमधील संबंध उत्तम प्रकारे स्पष्ट करणारा Venn आकृती निवडा
कच्चा माल, मजूर, यंत्रे

(a) 

(b) 

(c) 

(d) 

**Q80.** खालील शब्दांची तार्किक आणि अर्थपूर्ण क्रमाने मांडणी करा.
1. लस्ट्रम
2. शतक
3 साल
4. मिलेनियम
5. दशक
(a) 2, 1, 5, 3, 4
(b) 5, 1, 3, 2, 4
(c) 3, 1, 5, 2, 4
(d) 5, 4, 3, 2, 1

**Q81.** दिलेल्या पर्यायांमधून विषम पर्याय निवडा
(a) मार्च
(b) मे
(c) जून
(d) डिसेंबर

**Q82.** दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडा जो मालिका पूर्ण करेल.
8, 15, 28, 53, ?
(a) 106
(b) 100
(c) 108
(d) 102

**Q83.** तुम्हाला "GOOD" शब्दासाठी संच ओळखावा लागेल.

Matrix I

| | 0 | 1 | 2 | 3 | 4 |
|---|---|---|---|---|---|
| 0 | B | N | G | L | D |
| 1 | G | L | D | B | N |
| 2 | D | B | N | G | L |
| 3 | N | G | L | D | B |
| 4 | L | D | B | N | G |

Matrix II

| | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
|---|---|---|---|---|---|
| 5 | A | I | K | O | R |
| 6 | I | K | O | R | A |
| 7 | K | O | R | A | I |
| 8 | O | R | A | I | K |
| 9 | R | A | I | K | O |

(a) 02, 58, 68, 04
(b) 44, 99, 76, 20
(c) 31, 67, 76, 22
(d) 33, 76, 86, 41

**Q84.** X हा Y चा नवरा आहे, W ही X ची मुलगी आहे, Z हा W चा पती आहे. N ही Z ची मुलगी आहे. N आणि Y चे नाते काय आहे?
(a) चुलत भाऊ
(b) भाची
(c) मुलगी
(d) नात

**Q85.** प्रश्नात दिलेल्या निष्कर्षांपैकी कोणता निष्कर्ष विधानाचे तर्कशुद्धपणे पालन करतो.
**विधान**: I. सर्व निळ्या प्लेट्स आहेत.
II. काही प्लेट लाल असतात.
**निष्कर्ष**: I. लाल रंगाची प्लेट नसते.
II. काही निळ्या प्लेट्स आहेत.
(a) फक्त निष्कर्ष I अनुसरण करतो.
(b) फक्त निष्कर्ष II अनुसरण करतो.
(c) दोन्ही निष्कर्ष अनुसरण करतात
(d) I किंवा II निष्कर्ष नुसारण करत नाही.

**Q86.** 24 रुपये प्रति किलोची 32 किलो साखर 23 रुपये प्रति किलो किंमतीची 48 किलो साखर मिसळली जाते. प्रति किलो मिश्रणाची सरासरी किंमत किती आहे?
(a) रु. 23.6
(b) रु. 23.8
(c) रु. 23.4
(d) रु. 23.7

**Q87.** एका वस्तूवर मिळवलेला नफा 19% आहे. जर नफा विक्री किंमतीवर मोजला, तर तर किती टक्के नफा झाला असेल?
(a) $15\frac{103}{119}\%$
(b) $15\frac{109}{119}\%$
(c) $15\frac{117}{119}\%$
(d) $15\frac{115}{119}\%$

**Q88.** सरळव्याजावर गुंतवलेले 9100 रुपये 5 वर्षात 12600 रुपये होतात. त्याच व्याजदराच्या रकमेवर 9 वर्षांसाठी साधे व्याज किती असेल?
(a) रु. 5400
(b) रु. 7200.
(c) रु. 6300
(d) रु. 8100

**Q89.**एक वस्तू 100 रुपयांना विकला जातो. 20% आणि 14% च्या सलग सवलतींनंतर 571.04. तर त्या वस्तूची चिन्हांकित किंमत किती आहे?
(a) रु. 860
(b) रु. 840
(c) रु. 830
(d) रु. 880

**Q90.**थांबा नसलेली ट्रेन सरासरी 60 किमी/तास वेगाने प्रवास करते आणि थांब्यावर ती सरासरी 40 किमी/तास वेगाने प्रवास करते. ट्रेन प्रति तास सरासरी किती मिनिटे थांबते?
(a) 20
(b) 30
(c) 25
(d) 15


**Q91.** रासिका एक काम 5 दिवसात करू शकते. रश्मी हेच काम 7 दिवसांत करू शकते. त्या दोघी मिळून ते काम पूर्ण करतात आणि त्यांना कामाचे 240 रुपये मिळतात. रसिकाचा वाटा (रु मध्ये) किती आहे?
(a) 120
(b) 100
(c) 140
(d) 160

**Q92.** एका ठराविक प्रवासाचा 1/3 भाग 25 किमी/तास वेगाने पार केल्या जातो, प्रवासाचा 1/2 भाग 45 किमी/तास वेगाने आणि उरलेला भाग 37.5 किमी/तास वेगाने पार केल्या जातो. संपूर्ण प्रवासासाठी सरासरी वेग (किमी/तास मध्ये) किती आहे?
(a) 37.08
(b) 34.61
(c) 43
(d) 56

**Q93.** चौरसाचे क्षेत्रफळ 30.25 सेमी$^2$ आहे. त्याची परिमिती (सेमी मध्ये) शोधा.
(a) 44
(b) 23
(c) 22
(d) 46

**Q94.** वर्तुळाचे परीघ 110 सेमी आहे. त्याची त्रिज्या (सेमी मध्ये) शोधा.
(a) 35
(b) 19.5
(c) 17.5
(d) 39

**Directions (95-98): पाई चार्ट विशिष्ट देशाच्या अर्थव्यवस्थेच्या GDP मध्ये सर्व क्षेत्रांचे योगदान दर्शवितो. आकृतीचा अभ्यास करा आणि खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**




**Q95.** कोणत्या क्षेत्राने दुसऱ्या क्रमांकाचे योगदान दिले आहे?
(a) A
(b) C
(c) D
(d) F

**Q96.** देशाचा एकूण जीडीपी किती आहे (दशलक्ष डॉलर्समध्ये)?
(a) 400
(b) 450
(c) 360
(d) 300

**Q97.** D चे प्रतिनिधित्व करणाऱ्या सेक्टरच्या मध्यवर्ती कोनाचे (सेंट्रल अँगल) माप _______ अंश आहे.
(a) 30
(b) 36
(c) 45
(d) 60

**Q98.** जर पुढील वर्षी A, B आणि C क्षेत्रांमध्ये 9% वाढ झाली आणि उर्वरित क्षेत्रांमध्ये 3% वाढ झाली, तर एकूण अर्थव्यवस्था किती वाढली?
(a) 6.33%
(b) 5.55%
(c) 5%
(d) 7%

**Q99.** 28 सेमी आणि उंची 12 सेमी व्यासाच्या उजव्या वर्तुळाकार सिलेंडरचे एकूण पृष्ठभागाचे क्षेत्रफळ (cm$^2$ मध्ये) शोधा.
(a) 2200
(b) 2080
(c) 1920
(d) 2288

**Q100.** 2, 9, 6 आणि 5 प्रत्येक अंक फक्त एकदाच वापरून सर्वात मोठ्या चार-अंकी आणि सर्वात लहान चार-अंकी संख्येमध्ये काय फरक आहे?
(a) 6993
(b) 7056
(c) 6606
(d) 7083

## उत्तरे

**S1. Ans.(a)**
**Sol.** किंकर - दास, सेवक, भृत्य, अनुचर

**S2. Ans.(a)**
**Sol.** चपला - बिजली, वीज, तडित, विद्युत

**S3. Ans.(c)**
**Sol.** चिमुकले

**S4. Ans.(b)**
**Sol.** टवटवीत

**S5. Ans.(a)**
**Sol.** निसर्गात नसलेली वस्तू

**S6. Ans.(a)**
**Sol.** उंबराचे फूल

**S7. Ans.(c)**
**Sol.** गुप्त गोष्ट तिसऱ्यास सांगणे - षट्कर्णी होणे

**S8. Ans.(a)**
**Sol.** चंदन करणे - नाश करणे

**S9. Ans.(a)**
**Sol.** काडी चोर तो माडी चोर- क्षुल्लक अपराधाचा मोठा अपराधाशी संबंध जोडणे

**S10. Ans.(d)**
**Sol.** अनेक गोष्टीत एकाच वेळी लक्ष देणारा - अष्टावधानी

**S11. Ans.(c)**
**Sol.** वाक्याच्या शेवटी तपशील द्याव्यास असल्यास अपूर्ण विराम विरामचिन्ह वापरतात.

**S12. Ans.(b)**
**Sol.** उपसर्गघटित शब्द - 'प्रतिक्रिया'

**S13. Ans.(b)**
**Sol.** गुंडी, चप्पल

**S14. Ans.(c)**
**Sol.** अन्योक्ती अलंकार

**S15. Ans.(a)**
**Sol.** सेवानिवृत्त- सेवेतून निवृत्त - तत्पुरुष समास

**S16. Ans.(d)**
**Sol.** पुढे - या अव्ययापासून पुढच्या हे विशेषण बनलेले आहे म्हणून अव्यय साधित विशेषण होईल.

**S17. Ans.(d)**
**Sol.** स्वार्थ, अज्ञार्थ, विद्यार्थ आणि संकेतार्थ हे चार प्रकार क्रियापद या शब्द जातीचे आहेत.

**S18. Ans.(b)**
**Sol.** रीति भूतकाळ एखादी क्रिया भूतकाळात सतत करण्याची कर्त्याची रीत असेल, तर तो काळ 'रीतिभूतकाळ' असतो.

**S19. Ans.(c)**
**Sol.** ज्या क्रियाविशेषण अव्ययावरून क्रियेची निश्चित किंवा अनिश्चित संख्या समजते तेव्हा त्यास संख्यावाचक किंवा परिमाणवाचक क्रियाविशेषण अव्यये असे म्हणतात.
ही क्रियाविशेषण अव्यये क्रिया किती वेळा घडली हे दाखवितात.

**S20. Ans.(d)**
**Sol.** ज्या बहुव्रीही सामाजिक शब्दातील दोन्ही पदे महत्त्वाची नसून त्यावरून तिसऱ्याच अर्थाचा बोध होतो, तेव्हा त्यास 'बहुव्रीही समास' असे म्हणतात.
हा सामासिक शब्द त्या तिसऱ्या पदाचे विशेषण असतो
दशभूजा - दश आहेत भुजा जिला अशी ती (सप्तशृंगी)

**S21. Ans.(a)**
**Sol.** व्हिएतनाम आणि थायलंड हे अन्य दोन बिगरबासमती तांदळाचे पुरवठादार. आपल्या तांदूळ निर्यातबंदी निर्णयाचा मोठा फायदा या दोन देशांतील शेतकऱ्यांस होणार हे उघड आहे.

**S22. Ans.(a)**
**Sol.** या वर्षी गतसालाच्या तुलनेत तांदळाच्या दरांत सरासरी दहा टक्क्यांची वाढ झालेली आहे.

**S23. Ans.(a)**
**Sol.** गतसाली जगभरातील बाजारपेठेत साडेपाच कोटी टन तांदळाचा व्यवहार झाला.

**S24. Ans.(d)**
**Sol.** व्हिएतनाम आणि थायलंड हे अन्य दोन बिगरबासमती तांदळाचे पुरवठादार आहेत.

**S25. Ans.(c)**
**Sol.** भारत हा जगातील सर्वात मोठा बिगरबासमती तांदळाचा पुरवठादार. जागतिक बाजारात अशा प्रकारच्या तांदळाच्या बाजारपेठेतील 40 टक्के तांदूळ फक्त आपण एकटे पुरवतो.

**S26. Ans.(a)**
**Sol. Temerity** means excessive confidence or boldness; audacity and **Boldness** means willingness to take risks and act innovatively; confidence or courage.

**S27. Ans.(d)**
**Sol. Overweening** means showing excessive confidence or pride and **Modest** means unassuming in the estimation of one's abilities or achievements.

**S28. Ans.(b)**
**Sol. All over hell's half acre** means spread out across a great distance or area; all over the place. Primarily heard in US, South Africa.

**S29. Ans.(a)**
**Sol. An arrow in the quiver** means one of a number of resources or strategies that can be drawn on or followed.

**S30. Ans.(c)**
**Sol. Pyre** means a heap of combustible material, especially one for burning a corpse as part of a funeral ceremony.
**Dyke** means a long wall or embankment built to prevent flooding from the sea.
**Convey** means transport or carry to a place.

**S31. Ans.(c)**
**Sol. Bibliomancy** means the practice of foretelling the future by interpreting a randomly chosen passage from a book, especially the Bible.
**Logomancy** is a school of magick that derives from the power of words and language. In keeping with the idea that magick arises form the non-standard use of standard things, the logomancer is someone who has come to recognize words for what they are in and of themselves, independent of the meanings we attach to them.
**Amniomancy** is a method of divination whereby the future life of a child is predicted from the caul covering their head at birth. The colour and consistency of the caul are used to interpret the future. ... The word amniomancy comes from the Latin amnion, meaning membrane.

**S32. Ans.(b)**
**Sol. Excruciating** means very embarrassing, awkward, or tedious.

**S33.Ans.(c)**
**S34.Ans.(d)**

**S35. Ans.(b)**
**Sol.** "life" should be replaced with "living" to make the sentence contextually correct.

**S36. Ans.(b)**
**Sol.** "the bourgeoisie" is a common noun indicating a class with which a singular helping verb should be used thus "are" should be replaced with "is" in the second part of the sentence.

**S37. Ans.(a)**
**Sol.** "the" should be used before a superlative degree, thus "a" should be replaced with "the".

**S38.Ans.(b)**

**S39. Ans.(a)**
**Sol.** sentence is in present context and it is a general statement thus "begins" should be used

**S40. Ans.(b)**
**Sol.** As the comparison is being made thus "more" should be used.

**S41. Ans.(b)**
**Sol.** My windows look out on the garden because "look out" is a phrase which means to gaze outward from inside.

**S42. Ans.(d)**
**Sol.** Draft means a preliminary version of a piece of writing.

**S43. Ans.(c)**
**Sol.** The reward was not commensurate with the work done by us.

**S44. Ans.(c)**
**Sol.** about is a preposition which is used on the subject of; concerning.

**S45. Ans.(d)**
**Sol.** It should be "neither" because we have used "does not".

**S46. Ans.(c)**
**Sol.** Refer to, "Will you marry me, and play to me in my castle?"

**S47. Ans.(b)**
**Sol.** Refer to, "The fairy put a ring on his finger. At once he became a handsome young man dressed in princely robes."

**S48. Ans.(d)**
**Sol.** Refer to, "The fairy gave him a golden coach with twelve white horses. As he rode in State to Rome, he met the young Queen of Italy, who invited him to her place."

**S49. Ans.(a)**
**Sol.** Refer to, "The fairy gave him a golden coach with twelve white horses. As he rode in State to Rome, he met the young Queen of Italy, who invited him to her place.
The shepherd saw that he had won the Queen's heart. He resolved to marry her and become the Kind of Italy and let the fairy go."

**S50. Ans.(b)**
**Sol.** Refer to, "But at soon as he spoke he turned into an old and rugged shepherd.
"What is this horrible beggar doing here?" cried the Queen. "Whip him out of the palace

**S51. Ans.(a)**
**Sol.** रवींद्रनाथ टागोर यांनी गांधीजींना महात्मा ही पदवी बहाल केली होती.

**S52. Ans.(b)**
**Sol.** 3 एप्रिल 1926 रोजी लॉर्ड आयर्विन यांची भारताचे 30 वे व्हाईसरॉय आणि गव्हर्नर जनरल म्हणून नियुक्ती करण्यात आली. भारताच्या राजकारणासाठी हा सर्वात गोंधळाचा काळ होता. या काळात सायमन कमिशनची भेट (1928), नेहरू रिपोर्ट (1928), जिनांचे 14 मुद्दे, 1929 मध्ये सॉंडर्सची हत्या इत्यादी महत्त्वाच्या घटना घडल्या.

**S53. Ans.(c)**
**Sol.** एप्रिल 1928 मध्ये, नेहरू अहवालाच्या विरोधात जवाहरलाल नेहरू आणि सुभाषचंद्र बोस सचिव म्हणून आणि एस. श्रीनिवास अय्यंगार अध्यक्ष म्हणून "इंडिपेंडन्स ऑफ इंडिया लीग" ची स्थापना करण्यात आली.

**S54. Ans.(b)**
**Sol.** डिसेंबर 1929 च्या लाहोर अधिवेशनात कॉंग्रेसने पूर्ण स्वराज ठराव मंजूर केला. त्याच अधिवेशनात जवाहरलाल नेहरू यांची कॉंग्रेसच्या अध्यक्षपदी निवड झाली होती.

**S55. Ans.(c)**
**Sol.** राजस्थान हे भारतातील (क्षेत्रफळाच्या दृष्टीने) सर्वात मोठे राज्य आहे. हे 342, 239 चौरस किलोमीटर क्षेत्र व्यापते. हे संपूर्ण भारताच्या 10.4% चे प्रतिनिधित्व करते. क्षेत्रफळाच्या बाबतीत, राजस्थान नंतर मध्य प्रदेश (308,245 चौरस किलोमीटर), महाराष्ट्र (307,713 चौरस किलोमीटर), उत्तरप्रदेश (240,928 चौरस किलोमीटर) आहे.

**S56. Ans.(b)**
**Sol.** अफगाणिस्तान हा बर्मा (म्यानमार), थायलंड आणि लाओसच्या पुढे जगातील सर्वात मोठा अवैध अफू उत्पादक देश आहे.

**S57. Ans.(a)**
**Sol.** तालुका स्थरावर काम करणारी पंचायत राज मधील महत्वाची संस्था पंचायत समिती ही आहे.

**S58. Ans.(a)**
**Sol.** विद्युत चालकता हे एखाद्या सामग्रीखालील विद्युत प्रवाहाचे मोजमाप आहे. सर्वात विद्युत प्रवाहक घटक म्हणजे चांदी आणि त्यानंतर तांबे, ॲल्युमिनियम आणि लोह.

**S59. Ans.(c)**
**Sol.** ध्वनीचा वेग धातूमध्ये जास्तीत जास्त आणि वायूंमध्ये किमान असतो.

**S60. Ans.(a)**
**Sol.** सुपर कॉम्प्युटर PARAM 8000 (C-DAC ने बनवलेला) 01 जुलै 1991 रोजी लाँच करण्यात आला हा भारतातील पहिला सुपर कॉम्प्युटर मानला जातो.

**S61. Ans.(d)**
**Sol.** उज्जैन शहर क्षिप्रा नदीच्या काठावर आहे.

**S62. Ans.(b)**
**Sol.** बट्टाबोमालू हा आंध्र प्रदेशातील सर्वात प्रसिद्ध आणि लोकप्रिय नृत्य प्रकारांपैकी एक आहे.

**S63. Ans.(a)**
**Sol.** पेयजल आणि स्वच्छता विभाग (DDWS), जलशक्ती मंत्रालय 2 ऑक्टोबर 2022 रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती स्वच्छ भारत दिवस (SBD) म्हणून साजरी करणार आहे.

**S64. Ans.(c)**
**Sol.** भारतीय अंतराळ संशोधन संस्थेचे वरिष्ठ शास्त्रज्ञ ए के अनिल कुमार यांची आंतरराष्ट्रीय अंतराळ संशोधन महासंघ (IAF) च्या उपाध्यक्षपदी निवड झाली आहे.

**S65. Ans.(c)**
**Sol.** उल्कापाता पासून तयार झालेले महाराष्ट्रातील सरोवर लोणार हे आहे. हे खाऱ्या पाण्याचे सरोवर असून ते जि. बुलढाणा येथे आहे.

**S66. Ans.(c)**
**Sol.** संतोष यादव या एव्हरेस्टवर दोनदा चढाई करणारी जगातील पहिली महिला असलेल्या भारतीय आहेत . माउंट एव्हरेस्ट सर करणारी ती जगातील पहिली महिला आहे .

**S67. Ans.(d)**
**Sol.** सुशासन दिन दरवर्षी 25 डिसेंबर रोजी माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या जयंतीदिनी, लोकांमध्ये सरकारमधील जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यासाठी साजरा केला जातो.

**S68. Ans.(a)**
**Sol.** 13 नोव्हेंबर 2022 रोजी सुरू झालेला सिंगापूर आणि भारतीय लष्कर यांच्यातील द्विपक्षीय सराव अग्नी वॉरियरच्या 12 व्या आवृत्तीचा समारोप फील्ड फायरिंग रेंज, देवलाली (महाराष्ट्र) येथे झाला.

**S69. Ans.(a)**
**Sol.** नाईट फ्रँकच्या मते, प्रीमियम निवासी मालमत्तांच्या वार्षिक किमतीत वाढ मोजणाऱ्या जागतिक निर्देशांकात मुंबई 22 व्या क्रमांकावर आहे.

**S70. Ans.(b)**
**Sol.** प्रसून जोशी यांची उत्तराखंड सरकारने राज्याचे ब्रँड अँम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. पद्मश्री प्रसून जोशी सध्या सेंट्रल बोर्ड ऑफ फिल्म सर्टिफिकेशन (सेन्सॉर बोर्ड) चे अध्यक्ष आहेत.

**S71. Ans.(a)**
**Sol.** शंभू महादेव डोंगररांगामुळे भीमा व कृष्णा नद्यांची खोरी वेगळी झाली आहेत. महाराष्ट्र राज्याच्या सातारा जिल्ह्यातील ही एक प्रमुख डोंगररांग. महाराष्ट्र राज्याच्या पश्चिम भागात आणि सातारा जिल्ह्याच्या पश्चिम सीमेवर सह्याद्री ही प्रमुख पर्वतश्रेणी उत्तर-दक्षिण दिशेत पसरलेली आहे.

**S72. Ans.(d)**
**Sol.** महाराष्ट्रात मध्यवर्ती ऊस संशोधन केंद्र महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यातील पाडेगाव येथे 1932 साली स्थापन करण्यात आले


**S73. Ans.(c)**
**Sol.** आगरकरांनी 15 ऑक्टोबर 1988 रोजी सुरु केलेल्या सुधारक या साप्ताहिकाच्या इंग्रजी आवृत्तीचे पहिले संपादक गो. कृ. गोखले होते.

**S74. Ans.(a)**
**Sol.** महाराष्ट्रातील महिला विकासासाठी काम करणारे कार्यकर्ते आणि संस्थांना अहिल्याबाई होळकर पुरस्कार देण्यात येतो.


**S75. Ans.(b)**
**Sol.** जायकवाडी प्रकल्पामुळे तयार झालेला जलाशय नाथसागर या नावाने ओळखला जातो.

**S76. Ans.(b)**
**Sol.** सिंगापूर हा आशियाई देश आहे आणि बाकीचे युरोपियन देश आहेत.

**S77. Ans.(c)**
**Sol.** उलगडल्यानंतर कागद असे दिसेल:



**S78. Ans.(a)**
**Sol.**




I.✓ II.× III.✓


**S79. Ans.(a)**
**Sol.**




**S80. Ans.(c)**
**Sol.** 3, 1, 5, 2, 4 (वाढत्या क्रमाने उत्तर)

**S81.Ans.(c)**
**Sol.** जून वगळता सर्व महिन्यांत 31 दिवस असतात.


**S82. Ans.(d)**
**Sol.**




Hence, 102 is correct Answer.


**S83. Ans.(b)**
**Sol.** → GOOD ला → 44, 99, 76, 20 असे लिहिल्या जाईल

**S84. Ans.(d)**
**Sol.**





Hence, N is Grand-daughter of Y.

**S85. Ans.(b)**
**Sol.**




Only conclusion II follow.
Some blue are plates.

**S86. Ans.(c)**
**Sol.**




सरासरी किंमत = 23.4 रु. प्रति किलो.

**S87. Ans.(d)**
**Sol.**

नफा= $\frac{19}{100}$ ← नफा ← खरेदी किंमत

विक्री किंमत = 100+19 = 119

विक्री किमतीवरच शेकडा नफा = $\frac{19}{119} \times 100 = 15\frac{115}{119}$ %

**S88. Ans.(c)**
**Sol.**

सरळव्याज $= \frac{PRT}{100}$

$3500 = 9100 \times \frac{R}{100} \times 5R = 7\frac{9}{13}\%$

सरळव्याज $= 9100 \times \frac{1}{13} \times 9 = 6300$ रु.

**S89. Ans.(c)**
**Sol.**

संचयी सूट = a + b $-\frac{a \times b}{100}$

$= 20 + 14 - \frac{(20 \times 14)}{100}$

= 31.2

समजा चिन्हांकित किंमत . = 100 युनिट्स

तर, विक्री किंमत = 68.8 युनिट्स


आता 68.8 युनिट्स →रु. 571.04

100 युनिट्स → $\frac{571.04}{68.8} \times 100$ = रु. 830

**S90. Ans.(a)**
**Sol.**
थांबा/तास $=\frac{\text{वेगात फरक}}{\text{मूळ गती}}$

$\frac{20}{60}=\frac{1}{3}$ तास

किंवा $\frac{1}{3}\times 60 = 20$ मिनिटे

**S91. Ans.(c)**
**Sol.**


∴ रसिकाचा वाटा = 7 युनिट $=\frac{240}{7+5}\times 7 =$ ₹140

**S92. Ans.(b)**
**Sol.**
सरासरी वेग $=\frac{D}{\frac{D}{75}+\frac{D}{90}+\frac{D}{225}}=\frac{D}{(54+45+18)D}$

$= 34.61$

**S93. Ans.(c)**
**Sol.**
चौरसाचे क्षेत्रफळ = 30.25

चौरसाची बाजू== $\sqrt{30.25}=5.5$ सेमी

चौरसाची परिमिती = 4 × बाजू = 4 × 5.5

= 22 सेमी

**S94. Ans.(c)**
**Sol.**
वर्तुळाचे परीघ = 110 सेमी

$2\pi r$ = 110 सेमी

$r=\frac{110\times 7}{44}=\frac{70}{4}=17.5$ सेमी

**S95. Ans.(d)**
**Sol.** सेक्टर एफने दुसऱ्या क्रमांकाचे योगदान दिले आहे

**S96. Ans.(c)**
**Sol.**
एकूण जीडीपी = 100 + 40 + 60 + 30 + 40 + 65 + 25

= 360 दशलक्ष

**S97. Ans.(a)**
**Sol.**
प्रश्नात दिल्याप्रमाणे

360 दशलक्ष = 360°

∴ 30 दशलक्ष = 30°

**S98. Ans.(a)**
**Sol.**
A + B + C= $200\times\frac{9}{100}=18$ दशलक्ष

D + E + F + G= $160\times\frac{3}{100}=4.8$ दशलक्ष

एकूणच अर्थव्यवस्थेत वाढ= $\frac{22.8}{360}\times 100=\frac{228}{36}$

= 6.33%

**S99. Ans.(d)**
**Sol.**
सिलेंडरच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ = $2\pi r\,(h+r)$

$=2\times\frac{22}{7}\times 14\,(12+14)$

$=44\times 2\,(26)=88\times 26=2288$ सेमी²

**S100. Ans.(d)**
**Sol.** 9652 – 2569 = 7083

